जा.क्रं. ३९/१०-११
दिनांक : २०.०६.२०१०

**प्रति,**
**मा. डॉ. सुधीरकुमार गोयल साहेब,**
प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय: आपले दिनांक ०१.०६.२०१० चे पत्र संदर्भ व ना इलाजास्तव जुलै मध्ये पुन्हा आंदोलन करणेबाबत...**

**महोदय,**

आपले दिनांक ०१.०६.२०१० रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. आपण मुद्दा क्रं. १ मध्ये लिहीले आहे की, २४ एप्रिल २०१० अखेर रु. २८१ कोटी ठेवी कर्जाच्या वसुली द्वारे रोखीने अदा करण्यात आलेल्या आहेत. ११७.५७ कोटी रूपयांच्या ठेवी सुरक्षित करण्यात आलेल्या आहेत. त्याच प्रमाणे २८७ कोटी रुपयांच्या कर्जाची वसुली करण्यात आली आहे.

आपल्या खात्याकडून जनतेची, वरीष्टांची व आमची दिशाभुल करण्याचा प्रयत्न सतत तीन वर्षे होत आलेला आहे. वरील आकडे २४ एप्रिल २०१० अखेर असे म्हटले आहे व जे आकडे मी पाहतो ते दोन ते सव्वा दोन वर्षापासुन तीच तीच आकडेमोड केली जात आहे. ३९८.४७ कोटी रू. जे रोखीने आदा केले आहेत असेही म्हटले आहे. वरील सर्व आकडेमोडी प्रमाणे कोणकोणत्या कर्जदारांकडून वसुल केली याचे स्पष्टीकरण झाले तर वस्तुस्थितीची पाहणी करून आपणाकडून कसे खोटे आकडेमोड झाले हे दाखवून देता येईल म्हणजे आपल्या लक्षात येईल की, खालच्या अधिकाऱ्यांकडून येणारे आकडे हे कसे दिशाभुल करणारे आहेत.

मुद्दा क्रं. २ मध्ये सुध्दा मोठी आकडेवारी सादर करण्यात आलेली आहे. त्यात फौजदारी दावे झाले, २११२ व्यक्तींचा समावेश आहे,६३३ व्यक्तींना अटक झाली, काही संस्थांवर आरोप पत्र दाखल झाले. १६१ संस्थांविरूध्द कलम ८८ अन्वये चौकशीचे आदेश देण्यात आले. ८५ प्रकरणात चौकशी पुर्ण झाली १०२१ व्यक्तींवर ३५६ कोटींची जबाबदारी निश्चित करण्यात आली आणि २८७ लाख वसूल करण्यात आले. हे आपण सर्व कर्जदार, संस्था संचालक यांच्या बद्दल सांगितले आहे. या सर्व घोटाळ्याला जे ए.आर. , डी.डी.आर., ज्वाईंट रजिस्टार, लेखापरिक्षक जबाबदार आहे ते किती जण जेल मध्ये गेले या संबंधाने माहीतीच दिलेली नाही. या घोटाळ्याला खरे जबाबदार ते आहेत. जर क्रं. २ च्या मुद्यामध्ये आपण लिहीले आहे की, २८७ कोटी वसुल झाले ३९८.४७ कोटी सुरक्षित केले आहेत, व क्रं. ३ च्या मुद्यामध्ये म्हटले आहे ३८७ लाख वसुल केले आहेत, ही सर्व रक्कम सातशे कोटीच्या पुढे जाते व आजही ठेवीदारांचे देणे किमान एक हजार कोटी रूपये आहे.

म्हणजे सर्व दिशाभुल करणारे आकडे आहेत. आपण सर्व संस्थावार, व्यक्तीवार वसुलीची माहीती घ्या म्हणजे लक्षात येईल की, गेली अडीच वर्षे फक्त आकडे मोड करून दिशाभुल करण्याचाच प्रयत्न झालेला आहे.

जुलै २००७ पासुन ज्या बैठका झाल्या होत्या त्या अनेक बैठकामध्ये शासनाकडून आश्वासने दिली होती १ महिना, नंतर ३ महिने नंतर १ वर्ष या मुदतीमध्ये आम्ही सर्व ठेवीदारांचे ठेवीचे पैसे देऊ. तीन वर्षे झाली तरी अजुनही ठेवीदारांच्या ठेवीचे पैसे त्यांना मिळाले नाहीत. कोणीही ठेवीदार पैसे देण्याचा शिल्लक राहीला नाही अशी स्थिती निर्माण करू शकलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

मुद्दा क्रं. ३ मध्ये कायद्यासंबंधाने आपण म्हटले आहे की, नविन प्रकरण १० ब कलम ११० ब व इतर कलमात बदल करण्याचा मसुदा आयुक्त पातळीवरून शासनाला सादर करण्यात आलेला आहे. हा मसूदा करताना आयुक्तांनी सहकार क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तींशी सल्ला मसलत करून तयार करण्यात आला व तो मुख्यमंत्री महोदयांकडे सादर करण्यात आला आहे. त्याच मुद्या मध्ये पुन्हा म्हटले आहे की, महाराष्ट्र सहकारी कायद्यामध्ये बदल सुचविण्यासाठी ७ एप्रिल २०१० चे शासन निर्णयानुसार तज्ञांची एक समिती नेमली असून त्या समितिने उपसमित्या नेमल्या आहेत. सहकार आयुक्तांनी तयार केलेल्या कायद्याच्या मसुद्याची पुन्हा एकदा छाननी करण्यात येत असुन उपसमितीच्या शिफारशीनुसार मसुदा प्राप्त होताच केवळ सहकारी पतसंस्था संबंधीचा मसुदा विधी व न्याय विभागाकडून तपासून घेवून पावसाळी अधिवेशनात विधानसभेत आणले जाईल.

आता प्रश्न उभा राहतो की, सहकार आयुक्तांनी तज्ञ व्यक्तींशी सल्ला मसलत केलेल्या व मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविलेल्या मसुद्याचे काय झाले? यांची माहिती न घेताच पुन्हा एक तज्ञांची समिती नेमली आहे त्याचा बरोबर आणखी काही उपसमित्याही नेमल्या गेल्या हे शासनाला, विशेषत: सहकार खात्याला माहीत होते की, फक्त सहकारी पतसंस्था संबंधानेच कायदा करायचा आहे. आमचे आंदोलन मागे घेताना, तसेच त्यापुर्वीही अनेक वेळेला या पुढे सहकारी पतसंस्थांमध्ये गैरव्यवहार होणार नाहीत अशा प्रकारचा सहकारी पतसंस्थांचा कायदा करण्यात यावा असे म्हटले होते. एवढेच नाही तर मुख्यमंत्री महोदय व मुख्य सचिव यांच्या समवेत जी तातडीची बैठक दि. १९.०३.२०१० रोजी झाली त्यामध्ये निर्णय झाला होता की, सहकारी पतसंस्थांमध्ये पुढील काळात गैरव्यवहार होणार नाहीत असा कायदा करण्यात यावा. सदर बैठकीमध्ये सहकार विभागाच्या प्रधान सचिवांच्या सह्या आहेत. असं असताना उपसमित्यांची संकल्पना कोणी पुढे आणली आणि कशी आली हे कोडेच आहे? राज्य स्तरावरून ज्या दहा (१०) तज्ञ व्यक्तीची समिती नेमली होती त्याची बैठक २८.०४.२०१० रोजी व २५.०५.२०१० रोजी झाली त्या बैठकीमध्ये पतसंस्थांच्या कायद्याच्या विषयाला स्पर्शही झाला नाही. हे त्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या इतिवृत्तावरून दिसून येईल.सुरूवातीला सहकार आयुक्तांनी तज्ञ व्यक्तींशी व सहकार खात्यातील अनुभवी व्यक्तीशी सल्ला मसलत केली होती असं म्हटलं आहे त्यांची नांवे आम्हाला समजली तर आभारी राहू.

दि. २० मार्च २०१० रोजी आमचे आंदोलन मागे घेताना मा.ना. हर्षवर्धन पाटील साहेब, मा.ना. रामराजे निंबाळकर साहेब, मा.ना. बबनराव पाचपुते साहेब, मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव मा. श्री. नितीन करीर साहेब हे उपस्थित होते सर्वांनीच आश्वासन दिले होते की, एक सुंदर व कडक कायदा केला जाईल की त्यामुळे यापुढील काळात सहकारी

पतसंस्थांमध्ये घोटाळे होणार नाहीत. हे सर्व घडले असताना उपसमित्यांची कल्पना पुढे आलीच कशी? याचाच अर्थ स्पष्ट आहे की, कायदा होवू नये म्हणून चालढकल पणा करीत राहणे. सहकार खात्याच्या सर्व विभागाचे मसुदे तयार करून पावसाळी अधिवेशनात आणायचे , सहकार खात्याचा आवाका किती मोठा आहे. या सर्व खात्यांचा मसूदा तयार करणे, तो शासनाकडे पाठविणे नंतर मंत्रीमंडळाकडे जाणे, नंतर विधी व न्याय खात्याकडे जाणे,त्यांनी तपासण्या करणे नंतर अध्यादेश काढणे व त्यानंतर विधानसभेत आणणे. एक वर्षाच्या प्रक्रियेनंतरही सर्व विभागाचे कायदे होणे शक्य नाही हे अनेक वर्ष वरिष्ठ पातळीवरून काम केलेल्या अधिकाऱ्यांना माहित नसेल असे म्हणता येणार नाही. माहीत असतानाही जाणून बुजून असा चुकीचा निर्णय घेण्यात आला. याचा अर्थ असा आहे की, सदरचा कायदा करण्याची काही अधिकाऱ्यांची इच्छा नाही.

मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६.०५.२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये फक्त सहकारी पतसंस्थांचाच कायदा करावा असा निर्णय घेण्यात आला, तो पर्यंत दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी निघून गेलेला होता. त्यानंतर तज्ञांची फक्त दोन दिवसांची बैठक यशदा मध्ये घेण्यात आली व मसुदा तयार झाल्याचे सांगण्यात आले. सहकार आयुक्त सदर मसुदा घेवून आमच्याकडे आले. मात्र त्या मसुद्यामध्ये कोण कोणत्या बाबींचा अंतर्भाव आहे ते अद्यापही आम्हाला समजलेले नाही. फक्त दोन दिवसांच्या बैठकीमधून देशाला आदर्श असा कायदा होवू शकतो हीच आश्चर्याची बाब आहे. मी अधिक माहीती घेतली असता धक्कादायक बाब पुढे आली की जे तज्ञ या कायद्यासाठी नेमले होते त्यांना सुध्दा हा मसूदा काय आहे हे समजलेले नाही किंवा त्यांना मसुद्याच्या प्रति देण्यात आलेल्या नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब आहे असे वाटते. देशाला नवी दिशा देणारा कायदा तयार होत असताना सर्व बाबी गोपनीय ठेवून कायदा होणार असेल तर तो लोकशाहीला साजेसा कायदा, व देशाला दिशा देणारा कायदा होऊच शकत नाही. कायदा करताना तज्ञ कमेटीने काय काय करायला हवं हे शासनाच्या दि. ०७.०४.२०१० रोजीच्या पत्रकात सविस्तर लिहीलेले असुनही त्याकडे मुद्दाम डोळे झाक करण्यात आली आहे. आपल्या मतासारखा कायदा होणार असेल तर अशा कायद्याला काही अर्थ राहणार नाही.

मुद्दा क्रं. ४ मध्ये वसुली संबंधाने लिहीलं आहे की, मुख्यमंत्री महोदय, मुख्य सचिव व इतर सचिवांच्या उपस्थितीत झालेल्या निर्णयाप्रमाणे वसुलीची कार्यवाही अद्याप झालेली नाही.

मुद्दा क्रं. ५ ठेवीदारांना २०० कोटी रूपयांचे पॅकेज देवून परित्यक्त्या, विधवा, दारिद्र्य रेषेखालील, ज्येष्ट नागरिक अशा लोकांना तातडीने दहा हजार (१०,०००) रू. देण्यासाठी ३२.७९ कोटी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आले होते मात्र जवळ जवळ एक वर्षाचा कालावधी होवूनही ते ३२.७९ कोटी रूपये वाटप झालेले नाही. दि. १९.०३.२०१० रोजी झालेल्या मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीमध्ये व आमचे आंदोलन थांबविताना १० हजार ते ५० हजार रूपयांपर्यंतच्या ठेवीदारांना तात्काळ ठेवींचा पैसा देण्यात या असा निर्णय झालेला असताना अद्यापही त्या ठेवीदारांना त्यांचा पैसा मिळालेला नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रसुतीच्या वेदना गर्भवतीलाच जाणवतात त्या वांझोटीला कशा समजणार? सतत एअर कंडीशन मध्ये बसणाऱ्या माणसांना त्या धुणीभांडी करून जमा केलेला पैसा मिळत नाही म्हणून मुलीचं लग्न मोडते या दुःखाची जाणीव कशी होणार? सदर पैसाचे वाटप झाले नाही, यासाठी नियम,अटी, कागदपत्रे पाहवी लागतात अशी सबब सांगीतली जाते. मात्र कोणतेही कागदपत्र न पाहाता व नियमात बसत नसताना सहकार खात्याकडून (शासनाकडून) शेकडोकोटी रूपयांचे काही संस्थाना वाटप होतात कसे याचाही खुलासा जनतेला द्यावा लागेल.

एका बाबीचा मी अनुभव घेतला आहे की, सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. फक्त इंग्रजांच्या सत्तेमध्ये आणि लोकशाहीतील या सत्तेमध्ये काही बदल होतील अशी अपेक्षा होती मात्र काहीही बदल होत नाही याचं दु:ख होतं. या वेळेला मला आशा होती की, राज्यासाठी काहीतरी चांगलं होईल, म्हणून मी २५ जून २०१० पासून राज्यभर आंदोलन करण्याचे ठरविले होते मात्र सर्वांनीच आश्वासने दिल्याने गाफील राहीलो. आंदोलनाची वेळ येणार नाही असं वाटत होत म्हणून राज्यातील कार्यकर्त्यांना तयारी करण्यास सांगू शकलो नाही. पण आता मनोमन वाटू लागलं आहे की शासना कडून दिशाभूल होत आहे. म्हणून राज्यभर २५ जूनला जे आंदोलन होणार होते ते आता जुलै च्या पहिल्या आठवड्यात करण्याचे ठरविले आहे. लवकरच राज्यातील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन तारीख, वेळ व जागा कळवित आहे.

कळावे,

आपला,

(कि.बा.तथा अण्णा हजारे)

प्रत :

१. मा.ना.अशोकरावजी चव्हाण साहेब,
मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
२. मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब,
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
३. मा.ना.हर्षवर्धन पाटील साहेब,
सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
४. मा.ना.बबनराव पाचपुते साहेब,
आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री अहमदनगर, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
५. मा.श्री.रामराजे नाईक निंबाळकर साहेब,
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य, फलटण, जि. सातारा.
६. मा.श्री.जे. पी.डांगे साहेब,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
७. मा.श्री.राजगोपाल देवरा,
सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत , पुणे